**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

- **राज्यातल्या 246 नगरपरिषदा आणि 42 नगर पंचायतींसाठी निवडणुक कार्यक्रम जाहीर; २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबरला होणार मतमोजणी.**
- **महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत २ हजार ३९९ आजारांचा समावेश करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**
- **नागपूरच्या एलआयटी विद्यापीठास २०३० पर्यंत दरवर्षी ७ कोटी रुपयांचा निधी चार हप्त्यांमध्ये देण्यास मंत्रिमंडळाची मान्यता.**
- **विश्वविजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव यांचा राज्य सरकार रोख पुरस्कार देऊन करणार सन्मान.**

**<u>स्थानिक स्वराज्य संस्था आचारसंहिता</u>**

राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सदस्य पदासाठी आणि थेट अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता, दोन डिसेंबर रोजी मतदान तर तीन डिसेंबर रोजी, मतमोजणी होणार असल्याची घोषणा, राज्य निवडणूक आयुक्त, दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत घेतलेल्या, पत्रकार परिषदेत केली. या सर्व कार्यक्षेत्रात, आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे या निवडणुकांसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास दहा नोव्हेंबर पासून सुरुवात होईल. याची अंतिम तारीख, 17 नोव्हेंबर असेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध, अपील नसलेल्या ठिकाणी, 21 नोव्हेंबर पर्यंत तर अपील असलेल्या ठिकाणी, 25 नोव्हेंबर पर्यंत, नामनिर्देशन पत्रे मागे घेता येतील. मतदान दोन डिसेंबर रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच पर्यंत होईल. मतमोजणीला सर्व संबंधित ठिकाणी तीन डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजेपासून सुरुवात होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर नगरपरिषदा आणि नगर पंचायतींच्या क्षेत्रापुरती, आचारसंहिता संपुष्टात येईल असं, राज्य निवडणूक आयुक्त, दिनेश वाघमारे यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी नियंत्रण कक्ष आणि EVM बद्दल माहिती दिली.....

***पुरेशी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या निवडणुका इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनद्वारेच होणार आहे आणि त्यामध्ये 13,726 कंट्रोल युनिट आणि 27,452 बॅलेट युनिटची व्यवस्था केलेली आहे.***

दरम्यान, न्यायालयीन प्रकरणामुळे, अकोला जिल्ह्यातील पातुर नगर परिषदेची निवडणूक प्रक्रिया प्रलंबित असल्याचं, वाघमारे यांनी सांगितलं. नगरपरिषदा आणि नगरपंचायत यांच्या निवडणुकांसाठी, एकूण, एक कोटी ७ लाख तीन हजार 576 मतदार असून, त्यासाठी सुमारे 13 हजार 355 मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदार यादीतील आपले नाव शोधण्याकरिता, महासेक वोटरलिस्ट हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलं आहे.

**विशेष पुनरिक्षण मोहिम**

निवडणूक आयोगानं आजपासून, एस.आय.आर.चा म्हणजे, मतदार याद्यांच्या. विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून, एकंदर ५१ कोटी मतदारांची पडताळणी या मोहिमेत केली जाणार आहे. या मतदारांची पडताळणी करून, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. यापूर्वी बिहारमध्ये पडताळणी मोहीम आयोजित करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्यप्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार तसंच लक्षद्वीपमध्ये, मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यापैकी तमिळनाडू, केरळ, पुदुच्चेरी आणि पश्चिम बंगाल या राज्यांत, २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. कोणताही पात्र मतदार, निवडणूक प्रक्रियेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेणं, तसंच बेकायदा स्थलांतरितांसह, अपात्र मतदारांची नावं वगळणं हा या मोहिमेचा उद्देश असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**मंत्रिमंडळ निर्णय**

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत पंतप्रधान जनआरोग्य योजना या दोन्ही योजना अंतर्गत, उपचारांच्या यादीत सुधारणा करायला, राज्य मंत्रीमंडळानं आज, मान्यता दिली. ऐकुया आज झालेल्या मंत्रिमंडळ निर्णयाविषयी, हा सविस्तर रिपोर्ट-

*महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत दोन हजार ३९९ आजारांचा समावेश केला गेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुंबईत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. आयुष्मान कार्ड तयार करणाऱ्या आणि वितरीत करणाऱ्या आघाडीच्या फळीतल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सुविधांचं विकेंद्रीकरण करण्याच्या उद्‌देशानं शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचं नियमित पदावर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्ती करायलाही मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विदर्भातील नागपूर, वाशिम, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांशी संबंधित, महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. नागपूर इथल्या लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान अर्थात एल.आय.टी.विद्‌यापीठास, २०२५-२०२६ ते २०२९-२०३० या कालावधीत, दरवर्षी, सात कोटी रुपयांचा निधी, चार हप्त्यांमध्ये देण्यास मंजुरी देण्यात आली. तसंच वाशिम जिल्ह्यातील, वाईगौळ गावातील, एक पूर्णांक ५२ हेक्टर जमीन, भक्तनिवास आणि यात्रेकरूंसाठीच्या सोयींसाठी, ग्रामपंचायतीला विनामूल्य देण्यास मान्यता देण्यात आली. वर्धा शहरातील रामनगर इथल्या भाडेपट्‌ट्याने दिलेल्या भूखंडाला, कायम स्वरूपी मालकी हक्कानं देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, चंद्रपूर जिल्ह्यातील मुल इथं ३०० प्रवेश क्षमतेचं नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्यास तसंच, आवश्यक ३९ शिक्षक आणि ४२ शिक्षकेतर पदांना मंजुरी देण्यात आली.*

**वेतनवाढीची थकबाकी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एस.टी.च्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीची थकबाकीची रक्कम देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. एस.टी. महामंडळानं आज, प्रसिद्‌ध केलेल्या निवेदनात, ही माहिती देण्यात आली. कर्मचाऱ्यांना, २०२० ते २०२४ या कालावधीतील, वेतनवाढीची थकबाकी, रक्कमेनुसार पाच ते ४८ हप्त्यांमध्ये प्रदान केली जाणार आहे.

**मनसुख मांडवीय**

भारतीय हॉकीला यावर्षी, शंभर वर्ष पूर्ण होत असल्याच्या औचित्यानं, येत्या सात तारखेला दिल्लीच्या, मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा संकुलात, एक भव्य समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. केंद्रीय क्रीडामंत्री, मनसुख मांडवीय यांनी ही माहिती

दिली. या दिवशी देशातल्या, पाचशे पन्नास जिल्ह्यांमध्येही, यानिमित्त कार्यक्रम तसंच हॉकीचे सामने आयोजित केले जाणार आहेत.

**<u>सुयश धावणे</u>**

डॉ.संपदा मुंडे यांना, न्याय मिळावा या मागणीसाठी, नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय इथल्या निवासी डॉक्टरांची संघटना, मार्डच्यावतीनं नुकतंच एका रॅलीचं आयोजन करण्यात आलं. ओ.पी.डी.कॉम्प्लेक्स पासून, या रॅलीला सुरुवात करण्यात आली. वैद्यकीय समुदायासाठी सुरक्षितता, प्रतिष्ठा आणि न्यायाची मागणी करण्यासाठी, डॉक्टर मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. निवासी डॉक्टरांच्या या संपामुळे, रुग्णसेवेवर देखील परिणाम झाला आहे. रॅली आणि मागण्या याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. डॉ.सुयश धावणे यांनी'

***<u>भाऊबीजे दिवशी आमच्यामध्ये एक भगिनी तिला सिस्टमच्या काही कारणास्तव स्वतःच्या प्राणांची आहुती द्यावी लागली. बळी द्यावा लागला. तिला न्याय भेटावा यासाठी आमची रॅली चालू आहे. आम्ही आजपर्यंत शांततेत खूप सारे वेगवेगळ्या प्रकारे प्रोटेस्ट केले. त्यामध्ये आम्ही ब्लॅक रिबीन बांधण्यापासून ते पब्लिक अवेरनेसपासून सगळ्या कॅम्पेन केलं तरीही त्या पीडितेला आज 10 दिवस उलटले परंतु एसआईटीची गठन नाही झाली तर आमची मागणी आहे की लवकरात लवकर एसआईटी गठन व्हावी ज्या ज्या लोकांचे तीने आजपर्यंत नाव मेन्शन केले आहे त्या सगळ्या लोकांवरती ॲक्शन घ्यावी आणि याव्यतिरिक्त ही केस लवकरात लवकर निकाली लागावी.</u>***

**<u>महिला क्रिकेट अभिनंदन</u>**

आय.सी.सी.महिला विश्वचषकावर, पहिल्यांदाच भारताचं नाव कोरणाऱ्या, भारतीय संघाचं आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अभिनंदन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही, संघाच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले. तसंच महाराष्ट्राच्या खेळाडू, स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव यांना रोख पारितोषिकानं सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या विश्वविजेत्या संघाला, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं, ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक, या आधीच जाहीर केलं आहे.

**अतिवृष्टी मदत**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना, दिलासा देण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील, ५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात, ३०० कोटी रुपयांहून अधिक मदत निधी, जमा करण्यात आल्याची माहिती, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली. मेहकर, लोणार, चिखली, सिंदखेडराजा आदी तालुक्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे, मोठ्या प्रमाणावर पिकांचं नुकसान झालं होत. तसंच २०२४-२५ या वर्षातील पिक विम्याच्या अनुषंगानं, ६३ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात, १२१ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. या मदतीमुळे, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे तर, वर्धा जिल्ह्यातील 2 लाख 56 हजार शेतकऱ्यांना मदत वितरणासाठी 226 कोटी 92 लक्ष रुपये प्राप्त झालेत. त्यापैकी कालपर्यंत, एक लाख 27 हजार शेतकऱ्यांच्या खात्यात, 122 कोटी 26 लाख रुपयांचे वितरण करण्यात आले.

**हवामान**

येत्या काही तासात, नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये ठिकठिकाणी, मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात, तुरळक ठिकाणी हलका पाऊस होण्याची शक्यता, प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे.

**कोल्ह्याचा हल्ला**

वाशिम जिल्ह्यातील, मंगरुळपीर तालुक्यातील, वनोजा गावात, कोल्ह्याच्या हल्ल्यांची दहशत निर्माण झाली असून, या कोल्ह्यानं दोन मुलांसह काही नागरिकांना चावा घेतल्यानंतर आज, पुन्हा जनावरांवर हल्ला केला. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण असून, वनविभागानं तातडीनं उपाय योजना कराव्यात अशी मागणी, होत आहे.

**फडके जयंती**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातल्या सशस्त्र क्रांतीचे जनक, वासुदेव बळवंत फडके यांची आज, जयंती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप-मुख्यमंत्रीद्वय, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी, या दिनाच्या औचित्यानं वासुदेव बळवंत फडके यांना

आदरांजली वाहिली आहे. इंग्रजांविरुध्द सशस्त्र क्रांतीचे बंड पुकारणारे क्रांतिकारक, वासुदेव बळवंत फडके यांना, जयंती दिनी कोटी कोटी नमन असं, मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

*****